महाराष्ट्र टाइम्स
Marathi
IND Games Read and Earn Daily! LOGIN
थोडक्यात न्यूज महाराष्ट्र सिनेमॅजिक संपादकीय लाइफस्टाइल इन्फोटेक भविष्य करिअर हसा लेको
महाराष्ट्र मुंबई नवी मुंबई पुणे ठाणे नाशिक नागपूर औरंगाबाद कोल्हापूर सोलापूर अहमदनगर बीड लातूर नांदेड




ट्रेंडिंग संजय राऊत उद्धव ठाकरे एकनाथ खडसे अण्णा हजारे



# साथींनी शिकवलेले धडे

feedcrawler user | Maharashtra Times Updated: 22 Mar 2020, 4:00 am

Subscribe YouTube 59K
372

डॉ रितू परचुरे---गेल्या दोन-तीन दशकांत भारतातील आरोग्याचे प्रश्न बदलत गेले आहेत...




डॉ. रितू परचुरे

---

गेल्या दोन-तीन दशकांत भारतातील आरोग्याचे प्रश्न बदलत गेले आहेत. हवामानातील बदलाचे सावट गडद झाले, तसतशी संसर्गजन्य आजारांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. एकापाठोपाठ एक विषाणूंच्या साथींनी आपल्याल्या ग्रासले आहे. एचआयव्ही, इबोला, झिका, निपाह आणि आज 'करोना'च्या रूपाने आज जगासमोर संकट उभे ठाकले आहे. यापैकी प्रत्येक आजारात अनेकांनी जीव गेले, अनेक घरे देशोधडीला लागली. वित्तीय हानीही झाली; पण संकटातून नेहमीच काही तरी शिकण्यासारखे असते. या आजारांनीही सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत आपल्याला मोलाचे धडे दिले आहेत.








आजचे तापमान
28°C
मुंबई
H 29 / L 26
Cloudy
AD

Ad Times Prime

Get 1 Year Zee5 subscription free with Times Prime




VISIT SITE

Sponsored by COLOMBIA

---

सार्वजनिक आरोग्य हा विषय मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस पूर्ण करताना शिकले. पुढच्या काळात या विषयाशी जोडून काम करण्याची संधीही मिळाली. मी कधी क्लिनिकल प्रॅक्टिस केली नाही; पण तरीही, डॉक्टरकीचे प्रशिक्षण घेतलेली व्यक्ती म्हणून आजारांबद्दल, त्यांच्या निदान उपचाराबद्दल रोजच्या संभाषणात काही ना काही बोलणे होतच राहिले. एकच विषय कधी कोणी काढला नाही, मी काढला तर त्यात कोणी स्वारस्य दाखवले नाही. काहींना त्याचा अर्थ समजावून सांगताना माझीच दमछाक झाली. तो विषय, म्हणजे सार्वजनिक आरोग्य. पण करोनाच्या साथीच्या निमित्ताने गेल्या एक-दोन महिन्यांत अचानकपणे या विषयाचा उल्लेख रोजच्या संभाषणात येऊ लागलाय. विलगीकरण, प्रतिबंध, हातांची स्वच्छता हे शब्द सतत कानांवर आदळताहेत. जगावर ओढवलेला करोनाच्या संकटाच्या निमित्ताने सार्वजनिक आरोग्य या सतत दुर्लक्षित राहिलेल्या विषयाला उजाळा मिळतोय, ही एक आशादायी गोष्टच म्हणावी लागेल.

गेल्या दोन-तीन दशकांत भारतातील आरोग्याच्या प्रश्नाचे स्वरूप बदलत गेले आहे. सुरुवातीच्या काळात असलेले मुख्यत: संसर्गजन्य रोगांचे प्राबल्य हळूहळू कमी होत गेले. त्यांची जागा मधुमेह, रक्तदाब, कर्करोग अशा संसर्गाने न होणाऱ्या आजारांनी घेतली. मागच्या काही वर्षांत मात्र हवामानातील बदलाचे सावट जसजसे गडद झाले तसतशी संसर्गजन्य आजारांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. कॉलरासारखे अन्न-पाण्यातून पसरणारे आजार वर डोके काढताहेत. एकापाठोपाठ एक विषाणूंच्या साथींनी आपल्याल्या ग्रासले आहे. नजीकच्या काळातले एक ठळक उदाहरण म्हणजे एचआयव्ही. पाठोपाठची इबोला, झिका, निपाह अशी अजून काही उदाहरणे. करोनाच्या रूपाने आज जगासमोर 'न भूतो' असे संकट उभे ठाकले आहे. या प्रत्येक आजारात अनेकांनी जीव गमावले, अनेकांची घरे देशोधडीला लागली. वित्तीय हानीही मोठ्या प्रमाणावर झाली; पण कुठल्याही संकटातून नेहमीच काही तरी शिकण्यासारखे असते, तसेच, या आजारांनीही आरोग्यसेवेच्या, विशेषत: सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या, संदर्भात खूप काही धडे आपल्याला दिले आहेत. हवामान बदलामुळे येणारी काही दशके आरोग्याच्या दृष्टीने आव्हानात्मक असतील. ही आव्हाने पेलताना मागील काळातले हे अनुभव शिक्षण नक्कीच उपयोगी ठरेल.

असुरक्षित लैंगिक संबंधांमधून पसरणाऱ्या एचआयव्ही या आजाराची साथ नव्वदच्या दशकात आलेली. या साथीने आजवर ३ कोटींपेक्षा अधिक बळी घेतले. या आजारावर लस किंवा पूर्ण बरे करणारे औषध नाही. त्यामुळे 'एचआयव्ही'ची साथ आटोक्यात आणण्यासाठी सुरक्षित लैंगिक संबंध, वेळेवर निदान आणि आजार आटोक्यात ठेवणारी कायमस्वरूपी औषध याला पर्याय नाही. एचआयव्ही साथीने रोगप्रतिबंधक किंवा रोगनियंत्रण कार्यक्रमांचा नव्याने विचार करायला आपल्याला भाग पडले. आरोग्य सेवा ही आरोग्य व्यवस्थेने लोकांना द्यायची एक वस्तू आहे, अशी अनेकांची धारणा असते. लोकांची भूमिका यात निष्क्रीय धरली जाते. 'एचआयव्ही'च्या साथीविरुद्धचे प्रयत्न मात्र, याला अपवाद ठरले. एचआयव्ही आजाराविरुद्धच्या लढ्यात, ज्यांना लागण होण्याचा धोका सर्वांत जास्त आहे, अशा जोखमीच्या गटांनी (उदा. सेक्स वर्कर) सक्रिय सहभाग घेतला. 'एचआयव्ही'चा प्रसार कमी करण्यासाठी झालेल्या प्रयत्नात या गटांचे योगदान मोठे आहे. लैंगिकता, लिंगभाव, मानवाधिकार, समानता, सर्वसमावेशकता, असे एकंदरीत आरोग्य कार्यक्रमांमध्ये फारसे न अंगीकारलेले मुद्दे,

थोडक्यात
आणखी वाचा >

देश
तालिबानला 'अलकायदा'कडून शुभेच्छा, 'काश्मीर'ला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं आवाहन
अजून वाचा >

RECOMMENDED DEALS

HP Pavilion Gaming 10th Gen Intel Core i5 Processor 16.1-in...
₹ 65490 GET
₹ 81868 (20% OFF)

HP Pavilion x360 Touchscreen 2-in-1 FHD 14-inch Laptop (10th...
₹ 51990 GET
₹ 63179 (17% OFF)

HP Pavilion x360 Touchscreen 2-in-1 FHD 14" (35.56cms) Lapto...
₹ 74990 GET
₹ 92418 (18% OFF)

AVITA LIBER V14

पुणे व्हिडिओ

Pune : पुण्यात रंगकर्मींच्या आंदोलनात जागरण गोंधळ,... 02:34

ajit pawar drive electric rickshaw | अजित पवार यां... 01:34

pune building collapse | पुण्यात इमारत कोसळली;... 01:27

Pune News : पुण्यात उधळलेल्या म्हशीची दुचाकीला... 03:08

'एचआयव्ही'च्या निमित्ताने केंद्रस्थानी घेतले गेले. या तत्वांवर आधारित जनजागृती आणि जोखमीच्या गटांचे सक्षमीकरण केले गेले; तर लोकांच्या वागणुकीत दीर्घकालीन बदल होऊ शकतात, हे 'एचआयव्ही'विरुद्धच्या आरोग्य कार्यक्रमाने सोदाहरण दाखवून दिले.

एचआयव्ही या आजाराला वेढलेले दूषणांचे वलय हा या साथीचा अजून एक आव्हानात्मक भाग होता, आजही आहे. एड्सची लक्षणे, त्यामुळे होणारे मृत्यू, यामुळे या आजाराबद्दल समाजमनामध्ये खूप भीती-धास्ती होती. त्यातून रुग्णांना वाळीत टाकण्याचे, दूषणे देण्याचे, आरोग्य सेवा नाकारल्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडले. जोखीम असलेल्या लोकांची वेळेवर 'एचआयव्ही'ची तपासणी करण्यात, त्यांना वेळेवर औषध सुरू करण्यात त्यामुळे खूप अडचणी आल्या. 'इबोला'च्या साथीच्या बाबतीत थोड्याबहुत फरकाने हेच घडले. स्थानिक लोकांना विश्वासात न घेता, इबोला साथीचे निवारण करायला पोचलेल्या, बाहेर देशांतून आलेल्या आरोग्यसेवकांना, आफ्रिकेतल्या अनेक ठिकाणी स्वीकारल गेले नाही. काही ठिकाणी तर त्यांना कडाडून विरोध झाला. अशा संसर्गजन्य आणि जीवघेण्या आजारांच्या साथीमध्ये विषाणू-जीवाणूंच्या बरोबरीने भीती-अफवांची एक समांतर साथ सुरू होते. तिला वेळेवर आवर घातला नाही; तर आजाराचा सामना करणे फार अवघड होऊन बसते, हे या आजारांमध्ये फार ठळकपणे समोर आले. यातून एक गोष्ट नक्कीच शिकायला मिळाली; की फक्त धोक्याला अधोरेखित करून भीतीला खतपाणी घालणारी शास्त्रीय माहिती फायद्यापेक्षा नुकसानच जास्त करते. त्यातून येणाऱ्या निराशा, हतबलतेतून, आजाराचा, आजारी व्यक्तीचा स्वीकार कमी होतो. त्याबद्दलची लपवालपवी वाढते. विधायक कृती कमीच घडते. माहितीपूर्ण आरोग्य संदेश देताना ते अधिक सकारात्मक करणे फार महत्त्वाचे आहे. आपल्याकडे मुळात रोगप्रतिबंधाकडे अनेक जण फारशा गांभीर्याने बघत नाहीत. तसे घडायचे असेल; तर आपल्या समाजातील एकूणच आरोग्य साक्षरता वाढीस लागणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर किमान सोयीसुविधा, पोषक वातावरण सर्वांसाठी उपलब्ध असणेही महत्त्वाचे आहे. चांगल्या आरोग्यासाठी रोगनिवारण आणि रोगप्रतिबंध या दोन्ही बाजूंना समसमान महत्त्व आहे. ही जाणीव समाजमनामध्ये रुजली; तरच वैयक्तिक आणि व्यवस्था या दोन्ही पातळीवर त्यादृष्टीने सकारात्मक बदल घडतील.

आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक उपायांना परत एकदा केंद्रस्थानी आणून ठेवले ते नुकत्याच झालेल्या 'करोना'च्या उद्रेकामुळे. 'करोना'मुळे होणाऱ्या आजारावर कुठलेच औषध नाही, लस नाही. प्रतिबंध करणेच सध्या तरी हातात आहे. त्या निमित्ताने वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयींना उजाळा मिळालाय. आजारांशी जोडून दवा-पाणी, लसीकरण, दवाखाना-हॉस्पिटल एवढीच चर्चा करणारे आपण, करोनामुळे हात धुणे, शिंकताना-खोकताना तोंडावर रुमाल धरणे, रस्त्यावर न थुंकणे या रोजच्या आयुष्यातल्या सवयींबद्दल बोलू लागलोय. या सवयी लोकांनी स्वीकारायच्या तर पाणी, स्वच्छतागृह अशा सोयीसुविधाही हव्यात. भारतात अनेक जणांकडे त्या नाहीत. त्याची जाणीव या निमित्ताने परत एकदा होते आहे. करोनाच्या निमित्ताने विलगीकरणाबद्दलही खूप चर्चा होते आहे. वेगाने पसरू शकणाऱ्या साथीच्या आजारात विलगीकरण ही महत्त्वाची रणनीती मानली जाते. करोनाच्या साथीत ज्या-ज्या देशांनी ही नीती अगदी सुरुवातीच्या टप्प्यापासून गांभीर्याने अंमलात आणली, तिथला रोगप्रसार लक्षणीयरीत्या कमी दिसतो. या पद्धतीच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी धोका लवकरात लवकर ओळखून योग्य ती पावले उचलू शकणारा सार्वजनिक आरोग्य विभाग लागतो. आंतर-विभागीय समन्वय आणि सहकार्य लागते. राजकीय इच्छाशक्ती असेल आणि जनमताचा रेटा असेल तर मर्यादित संसाधन आणि पैसा असतानाही हे घडू शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे करोना साथीत सुरुवातीच्या टप्प्यात भारताने दिलेला प्रतिसाद. पण जर या आजाराचा फैलाव वाढला, रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली; तर येऊ शकणाऱ्या संकटाचा कुठलीच कमकुवत सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मुकाबला करू शकणार नाही.

पुढील काळातली आपल्यासमोरची आरोग्यविषयक आव्हाने गुंतागुंतीची असणार आहेत. स्थलांतर, शहरीकरण यामुळे शहरी लोकसंख्या वाढली आहे. या परिस्थितीत कुठलाही संसर्गजन्य आजार सीमारेषा ओलांडून वेगाने पसरण्याची शक्यता वाढते. दुसरीकडे हवामानातील बदलामुळे पडणारा अवकाळी पाऊस, दुष्काळ, अन्नाचे दुर्भीक्ष्य, कुपोषण, लोकांची ढासळती

Pune News : पुण्यात राडा; युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी भाजप...
03:07

## हेही वाचा

देह व्यापार केला तर गुन्हे दाखल करू; 'या' भागातील महिलांना पोलिसांचा इशारा

पाहा, VIP कशी देत आहे शैक्षणिक प्रगतीची हमी

AD

जळगाव जिल्ह्यात अतिवृष्टीनंतर 'हे' भीषण चित्र आलं समोर

Adv: Adv: अॅमेझॉन सेल; खरेदी करा आणि मिळवा ६० टक्के सूट

AD

नवख्या वेगवान गोलंदाजाचा टीम इंडियामध्ये समावेश, गोलंदाजी होणार आणखी मजबूत

अफगाणिस्तानमधून माघार घेणारा अमेरिकेचा 'तो' अखेरचा जवान कोण?

Bigg Boss 15 केव्हा होणार सुरू, किती वाजता आणि कोण असतील स्पर्धक

AD

तालिबानला 'अलकायदा'कडून शुभेच्छा, 'काश्मीर'ला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं आवाहन

२० वर्षांच्या मुलाने केली संपूर्ण कुटुंबाची हत्या, पोलिसांनी सांगितलं कारण...

AD

भटकंतीचा श्रीगणेशा! निसर्गप्रेमी पूजा सावंतची भ्रमंती सुरू

लाँच आधीच Realme 8i च्या प्रोसेसरचा खुलासा, मिळतील शानदार फीचर

प्रतिकारशक्ती हे दुष्टचक्र आजारांना खतपाणी घालू शकते. हवामान बदल हा या शतकातला सार्वजनिक आरोग्याचा सगळ्यात मोठा प्रश्न असेल, हे आता सुस्पष्ट आहे. पण या परिणामांचे निश्चित स्वरूप काय असेल याचा अंदाज आताच बांधणे अवघड आहे. पण अनारोग्याच्या या सावटाची व्याप्ती बरीच मोठी असू शकेल. त्याला तोंड देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट असावी लागेल.

आपल्या आरोग्यव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची नितांत गरज आहे. सर्व स्तरावरच्या शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये पुरेसा स्टाफ, सोयीसुविधा, औषधे हवीत. खासगी आरोग्यक्षेत्रात मिळणाऱ्या सेवेची गुणवत्ता आणि दर यावर नियंत्रण हवे, समाजातील आजारांच्या प्रमाणावर लक्ष ठेवणाऱ्या दक्ष आरोग्य यंत्रणाही हव्यात. सर्वांना पोषक अन्न, शुद्ध पाणी, सुरक्षित निवारा, शुद्ध हवा या मूलभूत गरजा पुरवणारी व्यवस्थाही सुदृढ हवी. दारिद्र्य, स्थलांतर व इतर सामाजिक आव्हानांचे भान ठेवून आरोग्य कार्यक्रमांची रूपरेषा ठरवायला हवी. जनसमुदायाचीही महत्त्वाची भूमिका असेल. ती फक्त दिलेले औषध खाणे, सांगितलेल्या सूचनांचे पालन करणे, एवढीच संकुचित असून भागणार नाही. वैयक्तिक पातळीवरचे प्रतिबंधात्मक उपाय किंवा जीवनशैलीतले आरोग्यदायी बदल यामध्ये लोकांचा उत्स्फूर्त सहभाग महत्त्वाचा असेल. आरोग्य कार्यक्रम आखताना, ते राबवताना लोकांचा सक्रीय सहभाग असेल, तर आरोग्यसेवा अधिक लोकाभिमुख होतील.

'करोना'च्या संकटाला आपण धीराने आणि एकजुटीने सामोरे जातो आहोत. जणू भविष्यातील आव्हानांची ही रंगीत तालीमच आहे. कळीचा मुद्दा हा आहे की, अनुभवातून आलेल्या या शिक्षणाचे आपण पुढे काय करणार आहोत.

...........

(लेखिका प्रयास आरोग्य गटातील वरिष्ठ संशोधक आहेत.)

नाबार्डमध्ये असिस्टंट मॅनेजर भरती परीक्षेसाठी प्रवेशपत्र जाहीर

Article ऐकायचेय ! तुमचा आवडता लेख सहज ऑडिओमध्ये कन्व्हर्ट करा, वापरा 'ही' भन्नाट ट्रिक

२ हजारांच्या बजेटमधील फोल्डेबल फीचर फोन, फीचर्स एकदा पाहाच

प्रेग्नेंसीदरम्यान त्वचेविषयक समस्यांचा करावा लागतो सामना, पण यावर उपाय काय?

नियमित महत्त्वाच्या बातम्या हव्या आहेत..?

example@domain.com जॉईन व्हा

Marathi News App : तुम्हालाही तुमच्या अवतीभवती होत असलेल्या बदलांमध्ये सहभागी व्हायचं आहे? सिटिझन रिपोर्टर अॅप डाउनलोड करा आणि रिपोर्ट्स पाठवा.

ताज्या बातम्यांसह अपडेट राहण्यासाठी लाइक करा Maharashtra Times फेसबुक पेज

Trending Topic

- Ajit Pawar
- Uddhav Thackeray
- Maharashtra Unlock
- Nilesh Rane

कॉमेंट लिहा

पुणे: सर्वाधिक वाचलेले

अन्यथा राज्यात पुन्हा निर्बंध लावावे लागतील!; अजित पवार यांचा थेट इशारा

अजून राष्ट्रवादीकडे वळलो नाही म्हणणाऱ्या राणेंना अजित पवारांचे उत्तर; म्हणाले...

पुण्यात पाणीपुरीवरून झालेल्या वादानंतर पत्नीची आत्महत्या

महत्त्वाचा लेख

करोना : 'दारूगोळा निर्मिती कारखाने बंद ठेवा'

AD

**Web Title :** lessons taught by peers